मकामुना(जे.124)–7–96–2,00,000 पु. / 3 पा.(6,00,000)–पीए4
कि.प्रो.कोड शेडयुल्ड 1, परिशिष्ट जी.क्र. 1
शा.प.वि.व.न्या.वि.क.एसबीएफ / 1180 / 45 / 10 / चार दि.4.4.81 अन्वये सुधारित

दिवाणी अ 37 प.
Civ. A 37 M

अव्वल मुकदम्यात
हुकुमनामा (ऑर्डर 20,
कानू. 6,7)
(फॉर्म नं. 1 पुरवणी
इ. परिशिष्ट 1).

# हुकूमनामा

## IN THE COURT OF THE JT. CIVIL JUDGE J.D., AT UDGIR

**R.C.S.NO. 115/2025** **Exh.11**

**शोभाबाई भ्र. दिपक भडके**

वयः ५० वर्षे, धंदाः घरकाम व मजूरी

रा.नालंदा नगर रेल्वे स्टेशन समोर, उदगीर ता.उदगीर जि.लातूर ... वादी

विरुध्द

१. **सुभाबाई भ्र. गोविंदराव भडके**

वयः ८५ वर्षे, धंदाः निरंक

२. **बालाजी पि. दिपक भडके**

वयः २७ वर्षे, धंदाः मजुरी

३. **नरसींग पि. दिपक भडके**

वयः २५ वर्षे, धंदाः मजुरी

तिघे रा.नालंदा नगर रेल्वे स्टेशन समोर, उदगीर ता.उदगीर जि.लातूर

४. **बबिता भ्र. व्यंकटराव बिरादार**

वयः ४५ वर्षे, धंदाः घरकाम

रा. सोमनाथपूर, अंबिका कॉलनी ता. उदगीर जि.लातूर

५. **कमलबाई भ्र. तानाजी सोनकांबळे**

वयः २५ वर्षे, धंदाः घरकाम

रा.होसुर ता.निलंगा जि.लातूर

... **प्रतिवादी**

दावाः- वाटणी होवून प्रत्यक्ष ताबा मिळणे बाबत.

Date of Institution : 11-03-2026

Date of Disposal : 13-04-2026

ता. १३ माहे ०४ सन २०२६ रोजी सह दिवाणी न्यायाधिश क स्तर, उदगीर समोर **वादीतर्फे वकील श्री. के. एस. दिंडे** व **प्रतिवादी तर्फे एस. बी. बंजीपल्ले** अखेर निकालासाठी मुकदामानिपात्या वरून असा हुकूम होत आहे की,

आदेश
(१३.०४.२०२६)

वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.क्र. १० वर तडजोडपत्र सादर केले आहे. त्यांना तडजोड मान्य व कबूल असल्याने सदरचा दावा नि.क्र.१० च्या तडजोडीप्रमाणे निकाली काढण्यात येतो. नि.क्र.१० च्या तडजोडपत्रा प्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा. न्यायालयीन शुल्क नियमाप्रमाणे वादीला परत करण्यात यावे.

सही/-

(श्री. व्ही. आर. घराळ )
सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) उदगीर.

दुय्यम प्रत

-03-

# मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर उदगीर यांचे न्यायालयात

दि.दा.नं. /2026

**शोभाबाई भ्र. दिपक भडके**

वय : 50 वर्षे धंदा : घरकाम व मजुरी

रा.नालंदा नगर रेल्वे स्टेशन समोर,

उदगीर ता.उदगीर जि लातूर

**वादी...**

विरूध्द

1) **सुभाबाई भ्र. गोविंदराव भडके**

वय : 85 वर्षे धंदा : निरंक

2) **बालाजी पि. दिपक भडके**

वय : 27 वर्षे, धंदा : मजुरी

3) **नरसींग पि. दिपक भडके**

वय : 25 वर्षे, धंदा : मजुरी

तिघे रा. नालंदा नगर रेल्वे स्टेशन समोर,

उदगीर ता.उदगीर जि लातूर

4) **बबिता भ्र. व्यंकटराव बिरादार**

वय : 45 वर्षे धंदा : घरकाम

रा. सोमनाथपूर,अंबिका कॉलनी

ता.उदगीर जि.लातूर

5) **कमलबाई भ्र. तानाजी सोनकांबळे**

वय : 41 वर्षे, धंदा : घरकाम

रा. होसुर ता.निलंगा जि.लातूर

**प्रतिवादी...**

**दावा : वाटणी होवून प्रत्यक्ष ताबा मिळणे बाबत.**

## मा. न्यायालयास सविनय सादर

हे की, वादी सदरचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता 1908 आदेश 7 नियम 1 प्रमाणे प्रतिवादी नं. 1 ते 4 विरूध्द खालील प्रमाणे दाखल करीत आहे.

1) हे की, वादी व प्रतिवादी हे वरील नमुद ठिकाणचे राहणारे असून हिंदू एकत्रीत अविभाजीत कुटूंबाचे सदस्य आहेत. त्यांना हिंदू मिताक्षरा कायदा लागू होतो जो या भागात प्रचलीत आहे प्रतिवादी क्र. 1 ही वादीची सासु असुन प्रतिवादी क्र. 2 व 3 ही मुले आहेत तसेच प्रतीवादी क्र. 4 ही वादीची नणंद आसून तसेच प्रतिवादी क्र. 5 ही प्रकरणातील वाद मिळकत विकत घेणारी तिऱ्हाईत व्यक्ती आहे.

2) हे की वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित हिंदू एकत्र कुटूंबाचे बांधकाम केलेले आर.सी.सी. चे घर आसून खालीप्रमाणे स्थावर मिळकत आहे.

**न.प.उदगीर हद्दीतील रल्वे स्टेशन समोर नालंदा नगर, उदगीर येथील सर्वे नं. 340/अ घर मिळकत ज्याचा (जुन) न.प.नं. 4-3-168/ (नवीन) 4-3-227 क्षेत्र पुर्व पश्चिम 40 फुट दक्षिण उत्तर 30 फुट ज्याची चतु:सिमा :**

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | 15 फुटाचा रोड |
| पश्चिमेस | : | शिवाजी कवठाळे यांचे घर |
| दक्षिणेस | : | 15 फुटाचा रोड |
| उत्तरेस | : | कोचेवाड यांचे घर |

नमुद चतुः सिमेतील व वर्णनातील मिळकती या वादी के प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित व एकत्रीत कुटूंबाच्या मिळकत असून प्रस्तुत दाव्याच्या पुढील परिच्छेदात पुनरावृत्ती टाळण्यासाठी "**वाद मिळकत**" म्हणून संबोधले जाईल.

4) हे की, प्रतिवादी क्र.1 चे पती म्हणजेच वादीचे सासरे नामे. गोविंदराव पि.सदाशिव भडके हे गेल्या 45 वर्षो पूर्वी मयत झाले असून वादीचे पती नामे दिपक गोविंदराव भडके हे दिनांक 29-03-2003 रोजी मयत झालेले आहे. वादीस तिचे दोन मुले व प्रतिवादी क्र. 1 व 4 सांभाळ करण्यास तयार नाहीत व तसेच वादीस वाद मिळकत घरामध्ये राहु देण्यास तयार नाहीत व भांडणे तंटे करून प्रतिवादी हे

आपाअपसात संगनमत करून वादीस घरातून हाकलून टाकण्याची सतत धमकी देत आहेत व सदर वाद मिळकत इतर तिऱ्हाईत व्यक्तीस विक्री करून टाकण्याचे धमकी देत आहेत. त्यानुसार वादीस नातलगाकडून असे समजले की, प्रतिवादी क्र. 1 ते 4 हे आपाअपसात संगनमत करून प्रतिवादी क्र. 5 हिस वाद मिळकती पैकी काही भाग म्हणजेच पूर्व - पश्चिम 35 फुट दक्षिण - उत्तर 14 फुट असे एकूण 490 चौ.फु विक्री करण्याचा ठराव दि. 04-11-2024 रोजी केलेला आहे जेणे करून वादीस तिचा हिस्सा मिळूनये व विक्री केलेली जागेचे पैसे सुध्दा वादीस मिळूनये म्हणून प्रतिवादी यांचा बेत आहे. सदर वाद मिळकत विक्री करण्याचे वादीस कळाल्यानंतर वादीने प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांना वाद मिळकतीची वाटणी करून वादी हिचा त्यात असलेला 1/3 हिस्सा तीस वाटून देण्याबाबत त्यांच्या इतर नातलगा समक्ष दिनांक 03/02/2026 रोजी त्यांच्या राहत्या घरी वाद मिळकत मध्ये विनंती केली पण वादीची विनंती प्रतिवादींनी ने नाकारली व वाद मिळकतीची वाटणी करून वादीचा 1/3 हिस्सा देण्याचे नाकारले त्याच सोबत प्रतिवादी क्र. 1 ने वाद मिळकती हया माझे एकटयाचे असून त्यात कोणाचाही काहीही हक्क संबंध नाही मी तुम्हास वाटून देणार नाही मी कोणासही विकून टाकीन असे म्हणून वादीस घराबाहेर हाकलून दिले सदर घटनेच्या वेळी प्रतिवादी क्र. 2 ते 4 हे सुध्दा हाजर होते पण त्यांने प्रतिवादी क्र. 1 हिस काहीही म्हणाले नाही उलट त्यास मुक संमती दिली. वादीने प्रतिवादींना समजावून सांगण्याचे व मिळकतीची वाटणी करून देण्याबाबत टाळले म्हणून वादीस दाव्यात प्रतिवादी करणे भाग पडले ज्यात त्यांचाही कायदेशीर हिस्सा आहे व तसेच प्रतिवादी क्र. 1 हिने प्रतिवादी क्र. 4 हिस वाद मिळकती मधील काही भाग विकण्याचा ठराव केल्यामुळे प्रतिवादी क्र. 5 हिस पार्टी करणे जरूरी झाले. वादीस वाद मिळकतीतील त्याचा कायदेशीर हक्क मिळण्याकरीता वाद मिळकतीची वाटणी करण्यासाठी प्रतिवादी क्र. 1 ने इन्कार केल्याने मा. न्यायलायात सदरचे प्रकरण दाखल करण्याशिवाय इतर पर्याय राहिला नाही म्हणून वादीस प्रतिवादी विरूध्द वाटणी व ताबा मिळण्याकरता प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचे कारण घडले ज्याप्रमाणे वादी त्यास हक्कपात्र असून प्रतिवादी यांना त्याचे उत्तर देणे बंधनकारक आहे.

5) हे की, वादीने दिनांक 03-02-2026 रोजी प्रतिवादी क्र. 1 यास वाद मिळकतीची वाटणी करून त्याचा 1/3 हिस्सा देण्याबाबत विनंती केली जी प्रतिवादीने नाकारली त्यामुळे सदरचा दावा दाखल करण्याचे कारण घडले त्याप्रमाणे वादीने त्याचा दावा मुदतीत दाखल केला आहे.

6) हे की, वादीने त्याचा दावा वाद मिळकतीची वाटणी करून त्याचा 1/3 हिस्सा वाटून देण्याबाबत दाखल केला आहे. त्यामुळे वादीने दाव्याचे मुल्यांकन न्यायालयीन मुद्रांक देणे कामी व कार्यक्षेत्राकरीता खालील प्रमाणे केले आहे. दावा वाद मिळकत चे सह दुय्यम निबंधक उदगीर यांनी दिलेल्या मुल्यांकन पत्रानुसार रू.7,32,830/- इतकी आहे. त्यामध्ये वादीचा 1/3 हिस्सा 2,44,276/- रूपये इतका होतो त्यानुसार वादी दाव्याचे मुल्यांकन अधिकार क्षेत्रासाठी 2,44,276/- रूपये करीत आहे. तसेच वादीला एकूण दावा मिळकतीची किंमत 7,32,830/- यावर एकूण कोर्ट फि मुल्यांकन 19230/- इतकी होते ज्यामध्ये वादीचा 1/3 हिस्स्यानुसार 6,410/- इतकी न्यायालयीन शुल्क द्यावे लागेल जे की महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क कायदा कलम 6 नुसार बरोबर आहे.

7) हे की, वाद मिळकतीचे स्थान वादी व प्रतिवादी यांचे रहावयाचे ठिकाण व सदरचा दावा दाखल करण्यास घडलेले कारण व ठिकाण लक्षात घेता वादीस सदरचा दावा दाखल करण्याचा व मा. न्यायालयास तो चालविण्याचा पुर्णपणे कार्यक्षेत्र प्राप्त होते.

8) वादी दाव्याच्या परिच्छेदात मा. न्यायालयाच्या पुर्वपरवानगीने बदल, वाढ दुरूस्ती करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

## <u>तरी विनंती की,</u>

हे की, वादीचा दावा खालील प्रमाणे मंजूर करण्यात यावा.

1) हे की, वाद मिळकतीची वाटणी करून त्यातील वादीचा 1/3 हिस्सा त्यास त्याच्या प्रत्यक्ष ताब्यात देऊन मालक असल्याचे घोषित करण्यात यावे.

4) या व्यतिरिक्त वादी इतर कोणत्या सुविधेस पात्र असल्यास ते त्याच्या हक्कात पारीत करण्यात यावे.

5) दाव्याचा खर्च वादीस देणेबाबत प्रतिवादी यांना आदेशीत करावे.

दिनांक : 11-03-2026

**वादी**

आशा

**शोभाबाई भ्र. दिपक भडके**

रा.नालंदा नगर रेल्वे स्टेशन समोर,

उदगीर ता.उदगीर जि लातूर

**तसदीक :**

मी वादी शपथेवर सत्य निवेदन करतो की, सदरील दाव्यातील सर्व मजकुर हा माझे माहिती प्रमाणे लिहला असून तो मला आमचे विधीज्ञांनी वाचून दाखवला तो सत्य व बरोबर असल्यामुळे आज रोजी उदगीर येथे तसदीक केली.

दिनांक : 11-03-2026

**वादी**

आशा

**शोभाबाई भ्र. दिपक भडके**

रा.नालंदा नगर रेल्वे स्टेशन समोर,

उदगीर ता.उदगीर जि लातूर

**तर्फे**

**ॲड.के.एस.दिंडे**

उदगीर

## मा. दिवाणी न्यायाधीश साहेब क. स्तर उदगीर यांच्या न्यायालयात

दि.दा.क्र. 115 /2026

शोभाबाई भ्र. दिपक भडके

**विरूध्द**

सुभाबाई भ्र. गोविंदराव भडके

**विषय : स्पेसिफिक परफॉर्मन्स ऑफ कॉंट्रेक्ट ॲक्ट प्रमाणे दावा.**

## तडजोडपत्र

वादी व प्रतिवादी हे आपली तडजोड खालीलप्रमाणे मे. न्यायालयात दाखल करीत आहेत.

1) हे की, वादी व प्रतिवादी यांच्यात जवळच्या नातलगांनी व प्रतिष्ठीत पंचानी तडजोड घडवून आणली आहे. त्यामुळे वादींनी दिलेला दावा प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

2) हे की, सदर दाव्यात नमुद केल्याप्रमाणे वाद मिळकत मौजे उदगीर हद्दीतील रेल्वे स्टेशन समोर, नालंदा नगर उदगीर येथील सर्वे नं. 340/अ घर मिळकत ज्याच्या न.प. नं 4-3-168 (जुन) 4-3-227 (नविन) क्षेत्र लांबी रुंदी पूर्व पश्चिम 40 फुट दक्षिण उत्तर बाजु 31फुट आहे एकूण 1271 चौ.फुट असून ज्याची चतु:सिमा खालीप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | कोचेवाड यांचे घर |
| पश्चिमेस | : | 15 फुटाचा रोड |
| दक्षिणेस | : | 15 फुटाचा रोड |
| उत्तरेस | : | शिवाजी कवठाळे यांचे घर |

सदर चतुः सिमेच्या आतील मिळकत ही दि. 04-11-2024 रोजीच्या ठरावाप्रमाणे प्रतिवादी क्र. 1 हिने प्रतिवादी क्र. 5 हिस वाद मिळकती पैकी पूर्व - पश्चिम 31 फुट, दक्षिण - उत्तर 14 फुट असे एकूण 434 चौ.फु. रक्कम रूपये 30,00,00/- (अक्षरी तीन लाख रूपये) मध्ये विक्री करण्याचा ठराव दिनांक 04-11-2024 रोजी करून प्रतिवादी क्र. 1 हिने प्रतिवादी क्र. 5 कडून इसरा रक्कम 20,00,00/- (अक्षरी दोन लाख रूपये) स्विकारलेली आहे व उर्वरीत रक्कम 10,00,00/- (अक्षरी एक लाख रूपये)

प्रतिवादी क्र. 1 ने प्रतिवादी क्र. 5 कडून आज रोजी स्विकारलेली आहे. तरी आज रोजीच्या वादी व प्रतिवादी यांच्या तडजोडीनुसार प्रतिवादी क्र. 5 हिस वाद मिळकती मध्ये पूर्व - पश्चिम 31 फुट, दक्षिण - उत्तर 14 फुट असे एकूण 434 चौ.फु. ऐवढी जागा प्रतिवादी क्र. 5 हिस देण्याचे ठरले असून वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांना मान्य व कबूल आहे.

**अ. प्रतिवादी क्र. 5 च्या हिश्यास देण्यात आलेल्या जागेची चतुर्सिमा पुढीलप्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | कोचेवाड यांचे घर |
| पश्चिमेस | : | 15 फुटाचा रोड |
| दक्षिणेस | : | वादी शोभाबाई भडके यांचे हिश्यास आलेली जागा |
| उत्तरेस | : | शिवाजी कवठाळे यांचे घर |

**ब. वादी च्या हिश्यास देण्यात आलेली उर्वेरीत जागेची चतुर्सिमा पुढीलप्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | काचेवाड यांचे घर |
| पश्चिमेस | : | 15 फुटाचा रोड |
| दक्षिणेस | : | 15 फुटाचा रोड |
| उत्तरेस | : | प्रतिवादी क्र.5 च्या हिश्यास दिलेली जागा |

तसेच तडजोडीप्रमाणे **प्रतिवादी क्र. 1 हि प्रतिवादी क्र. 5 हिस वाद मिळकतीमध्ये दिलेली 14 X 31 = 434 चौ.फुट सोडून उर्वेरीत जागा 26 X 31 = एकूण 806 चौ.फु. ब मध्ये दर्शवलेली घर जागा वादीच्या नावे कायमस्वरूपी देण्यात आलेले आहे.** त्यास प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांची पूर्ण संमती आहे. तरी वरील तडजोडीप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र. 5 यांना देण्यात आलेल्या घर जागेचे मालक व ताबेदार कायमस्वरूपी राहुन आपापल्या नावे न.प. उदगीर येथे फेरफार करून घेतल्यास प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांची कसलीही उजर तक्रार भविष्यात राहणार नाही.

4) हे की, सदर तडजोडीनुसार वाद मिळकतीचा ताबा वादीव प्रतिवादी क्र. 5 च्या हक्कात कायमस्वरूपी देण्यात आलेला आहे त्यानुसार वादी व प्रतिवादी क्र. 5

मिळकतीचा कायमस्वरूपी उपभोग वादी व प्रतिवादी क्र. 5 इच्छेप्रमाणे घ्यावा हे प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांना मान्य व कबूल आहे व तसेच आज रोजीच्या तडजोडीनुसार प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांचा वादी व प्रतिवादी क्र. 5 च्या हिश्यास दिलेल्या मिळकतीत कसलाही अधिकार, हक्क राहिला नाही हे प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांना मान्य व कबूल आहे व भविष्यात प्रतिवादी क्र. 1 ते 4 हे वादीस व प्रतिवादी क्र. 5 हिस वाद मिळकत बाबत कसलाही अडथळा करणार नाहीत असे प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांनी मान्य व कबूल केले आहे.

सबब हे तडजोडपत्र.

**<u>तरी विनंती की,</u>**

मे. साहेबांनी वादी व प्रतिवादी यांच्या मार्फत आज रोजी सादर केलेली तडजोड स्वीकारून तडजोडीप्रमाणे प्रकरण निकाली काढून वादी व प्रतिवादी क्र. 5 च्या हक्कात डिक्री करण्याचा आदेश करण्याची कृपा करावी.

दिनांक : 13-04-2024 नि. अं. शोभाबाई

**वादी**

शो.बा.

**शोभाबाई भ्र. दिपक भडके**
रा. नालंदा नगर रेल्वे स्टेशन समोर,
ता.उदगीर जि.लातूर

**प्रतिवादी**

नि. अं. सुभाबाई

1) **सुभाबाई भ्र. गोविंदराव भडके** नि. अं. बालाजी

बालाजी

2) **बालाजी पि.दिपक भ...**

नरसींग नि. अं. नरसींग

3) **नरसींग पि.दिपक भ...**
तिघे रा. नालंदा नगर रेल्वे स्टेशन समोर, ता.उदगीर जि.लातूर

बबिता नि. अं. बबिता

4) **बबिता भ्र. व्यंकटराव बि...**
रा. सोमनाथपूर, अंबिका कॉलनी
ता.उदगीर जि.लातूर

नि. अं. कमलबाई

कमल

5) **कमलबाई भ्र. तानाजी सोनकाबळे**
रा. होसुर ता.निलंगा जि.लातूर

वादीचे विधीज्ञ

ॲड.के.एस. दिंडे

उदगीर

प्रतिवादीचे विधीज्ञ

ॲड.एस.बि.बंज्जीपल्ले

उदगीर

प्रतिवादी याने दाव्याच्या खर्चाबदल रक्कम रूपये आज तारखेपासून – उप्रापतीच्या तारखेपर्यत त्यावर दरसाल दर शेकडा – टक्के दराने होणा–या व्याजासह वादी याना द्यावे.

## खर्चाचा आकडा

| | वादीला झालेला | रूपये | पैसे | | प्रतिवादीला झालेला | रूपये | रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | फिर्याद अर्जास स्टॅम्प | 6410 | 00 | 1 | बजावटीला किंवा विरूध्द दाव्यास स्टॅम्प | 0 | 0 |
| 2 | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प | 10 | 00 | 2 | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प | 10 | 0 |
| 3 | एकूण पुढील बाजूवर दिलेली | 0 | | 3 | एकूण पुढील बाजूवर दिलेली | 0 | 0 |
| 4 | साक्षीदारास पोटगी | 0 | | 4 | साक्षीदारास पोटगी | 0 | 0 |
| 5 | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडकरांची फी विरूध्द दाव्यातील प्लीडकराची फी | 1724 | 00 | 5 | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडकरांची फी विरूध्द दाव्यातील प्लीडकराची फी | 1724 | 0 |
| 6 | प्रोसेस लागू करणे | 0 | | 6 | प्रोसेस लागू करणे | 0 | 0 |
| 7 | कमिशनरची फी | 0 | | 7 | कमिशनरची फी | 0 | 0 |
| 8 | भाषांतराची फी | 0 | | 8 | भाषांतराची फी | 0 | 0 |
| 9 | नकला करण्यासाठी फी | 0 | | 9 | नकला करण्यासाठी फी | 0 | 0 |
| 10 | तहकुबीबदल दिलेला वारस दाखल करण्याबदलच्या | 0 | | 10 | तहकुबीबदल दिलेला वारस दाखल करण्याबदलच्या | 0 | 0 |
| 11 | अर्जावरील स्टॅम्प | 0 | | 11 | अर्जावरील स्टॅम्प | 0 | 0 |
| | **एकूण** | **8144** | 00 | | **एकूण** | **1734** | **0** |
| | न दिलेला खर्च | 0 | | | न दिलेला खर्च | 0 | 0 |
| | फिर्याद अर्जावरील | 0 | | | विरूध्द दाव्यावरील | 0 | 0 |
| | प्लीडरच्या फीवरील प्रोसेसीवरील | 0 | | | प्लीडरच्या फीवरील प्रोसेसीवरील | 0 | 0 |
| | दाखल झालेल्या कागदावरील (पुढील बाजूवर पहा) | 0 | | | दाखल झालेल्या कागदावरील (पुढील बाजूवर पहा) | 0 | 0 |
| | बाकी | **8144** | 00 | | बाकी | **1734** | **0** |

आज तारीख 13 माहे 04 सन 2026 रोजी आमच्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला.

लिपिक

वादीतर्फे वकील

प्रतिवादीतर्फे वकिल

( व्ही. आर. घराळ )
सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, उदगीर

CIVIL COURT, JUNIOR DIVISION * UDGIR * सत्यमेव जयते

(हया मुकत्म्यातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर कलेले कोणतेही दस्तऐवज तज ते परत नेले नसले तर अपील झाले असल्यास अपीलाचा निकाल झाल्यावर नाश करून टाकण्यास पात्र होतील.)

| वादीकडून | | | | प्रतिवादीकडून | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दिलेला खर्च दाखल झालेले कागद नंबर | रूपये | पैसे | | दिलेला खर्च दाखल झालेले कागद नंबर | रूपये | पैसे | |
| एकूण | | | | एकूण | | | |
| दिलेला खर्च दाखल झालेले कागद नंबर | | | | दिलेला खर्च दाखल झालेले कागद नंबर | | | |
| एकूण | | | | एकूण | | | |